# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/ 9258 /२०१८ दिनांक २६/१०/२०१८

**प्रति,**

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :— दिनांक ३० डिसेंबर, २०१८ रोजी आयोजीत एक दिवसीय जिल्हा स्तरीय चौथे अधिवेशना बाबत.**

**संदर्भ** :— चंद्रपूर—गडचिरोली जिल्हा अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली कार्यक्षेत्र यांचे निवेदन.

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, चंद्रपूर—गडचिरोली जिल्हा अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली कार्यक्षेत्र यांनी दिलेल्या निवेदनानुसार शिक्षकेत्तर कर्मचा—यांचे एक दिवसीय जिल्हा स्तरीय चौथे अधिवेशन दिनांक ३० डिसेंबर, २०१८ रोजी गोविंदराव वारजुकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभिड, जि. चंद्रपूर येथे आयोजीत करण्यात आलेले आहे.

करीता आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या शिक्षकेत्तर कर्मचा—यांना याबाबत अवगत करून देण्यात यावे, ही विनंती.

संलग्न :— शिक्षकेत्तर स्मरणिका.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
प्रभारी कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# * विशेष सुचना *

सर्व पदाधिकारी व युनिट प्रमुखांनी किमान एक पानाची जाहिरात अंकासाठी मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.

युनिट छोटे असल्यास अगर जाहिरातदारांशी संपर्क साधू शकत नसल्यास आपल्या युनिटची अधिवेशनास हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्याची जाहिरात द्यावी. त्याकरिता किमान १००० रूपये देणगी स्वरूपात द्यावेत.

पदाधिकारी आणि युनिट प्रमुखांनी आपला पासपोर्ट साईज फोटो महाविद्यालयाच्या संपूर्ण नावासह द्यावा सोबत रूपये २००/- द्यावेत. त्यांना विशेषाकांत प्रसिध्दी दिली जाईल. दिनांक २९/११/२०१८ पर्यंत येणारेच फोटो स्विकारले जातील.

आपल्या युनिटमध्ये घडलेली विशेष महत्वपूर्ण घटना सुखद अगर दुःखद थोडक्यात द्यावी. त्याला योग्य ती दुरूस्ती करून प्रसिध्द केली जाईल.

जाहिरात मिळवून देणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना संघटनेबद्दल व आपले प्रश्नाबद्दल काही विचार, मार्गदर्शन करावयाचे असेल तर ते थोडक्यात सुमारे शंभर ते दिडशे शब्दात व्यक्त केल्यास व ते योग्य असल्यास प्रसिध्द केले जाईल. लेख खालील पत्यावर पाठवावे.


**श्री. सचिन सुरवाडे**

संपादक

स्मरणिका समिती, व्दारा : नगिनाबाग, चोर खिडकी, वार्ड नं. १,

धम्मकिर्ती विहार मार्ग, चंद्रपूर मो. नं. ९६०४९७०४४२

ई-मेल : sachin.shrirams@gmail.com

संपर्क : अनय पेपर मार्ट व स्टेशनरी, एकविरा मंदिर समोर,

एकोरी वार्ड नं. १, चंद्रपूर मो. नं. ८८३०९४७९०५,

व्हॉट्सअप नं. ९२८४६१२९६९, ९४२३११७९३४


॥ एकता मे बल ॥

# चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना

र.नं. ३९६७

(गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली कार्यक्षेत्र)

# चंद्रपूर-गडचिरोली
# जिल्हा स्तरीय चौथे अधिवेशन

## दिनांक : ३० डिसेंबर २०१८

### * स्थळ *

## गोविंदराव वारजुकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभिड, जि. चंद्रपूर

# शिक्षकेत्तर स्मरणिका

श्री/श्रीमती ______________________ सप्रेम नमस्कार

सहर्ष कळविण्यात येत आहे की, चंद्रपूर-गडचिरोली अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना स्थापन होऊन ३५ वर्षाचा कार्यकाळ लोटला आहे. या कार्यकाळात संघटनेनी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या हितासाठी सरकारी व सामाजिक निमसरकारी स्तरावर प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी तत्परता दाखविली आहे. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये संघटने विषयी उत्साह, आपुलकी निर्माण झाली आणि या आपुलकीमुळेच नव्याने श्रमिक संघ कायद्यानुसार पंजीकरण झालेल्या संघटनेनी निर्णय घेतला की, चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा स्तरिय चौथे एक दिवसीय भव्य अधिवेशन गोविंदराव वारजुकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभिड, जि, चंद्रपूर येथे घेण्यात यावे. अधिवेशन प्रसंगी स्मरणिका काढण्याचे ठरविले आहे. स्मरणिकेत शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसंबंधी सरकारी जी.आर., संघटनेने केलेल्या चर्चे विषयी सविस्तर माहिती, सामाजिक मार्गदर्शनपर लेख इ. प्रकाशित होणार आहे. तरी आपण आपले महाविद्यालय, संस्था, शुभेच्छुकाच्या शुभेच्छा व जाहिरात देऊन सहकार्य करावे. आपण दिलेल्या जाहिरातीव्दारे आर्थिक सहकार्यामुळे एक नवीन विश्वास निर्माण होईल. आपल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

धन्यवाद !

*** आपले विश्वासु ***

| | |
|---|---|
| **श्री. पांडुरंग चौधरी**<br>संयोजक अधिवेशन समिती<br>मो. नं. ९४२१७२१५०७ | **श्री. प्रशांत रंदई**<br>सहसंयोजक अधिवेशन समिती<br>मो. नं. ८४८२९७०३३० |
| **श्री. विशाल गौरकार**<br>अध्यक्ष<br>चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा अ.म.शि.क. संघटना<br>मो. नं. ९८५०३६९७४७ | **श्री. रूपेश चिंचोळे**<br>महासचिव<br>चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा अ.म.शि.क. संघटना<br>मो. नं. ९७६३२३३०४४ |

टिप : जाहिरात व धनादेश/धनाकर्ष दि. २९/११/२०१८ पर्यंत जिल्हा अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना अधिवेशन समिती, व्दारा : सचिन श्रीराम सुरवाडे, नगिनाबाग, चोर खिडकी, वार्ड नं. १, धम्मकिर्ती विहार मार्ग, चंद्रपूर मो. नं. ९६०४९७०४४२
ई-मेल : sachin.shrirams@gmail.com

संपर्क : अनय पेपर मार्ट व स्टेशनरी, एकविरा मंदिर समोर, एकोरी वार्ड नं. १, चंद्रपूर
मो. नं. ८८३०९४७९०५, व्हॉट्सअप नं. ९२८४६१२९६९, ९४२३११७९३४

# SPACE ORDER FORM

| | |
|---|---|
| **Mr. P. N. Chaudhari**<br>Sanyojak | **Mr. P. B. Randai**<br>Sah. Sanyojak |

Adhivashan Sanyojan Samittee
G.W. College, Naghbir, Dist. Chandrapur

## IN RESPONSE TO YOR APEAL

Dated ______________________ we agree to take a Special/Full/Half/Quarter Page or Rs. ____________ in the souvenir of "Shikshaketar Samaj"

### ❖ Rate of Advertisements ❖

| | |
|---|---|
| Back Cover (Colour) | Rs. 15,000 |
| Inside Cover (Colour) | Rs. 10,000 |
| Full (Page (Colour) | Rs. 7,500 |
| Half Page (Colour) | Rs. 4,000 |
| Quarter Page (Colour) | Rs. 2,000 |
| Full Page (B/W) | Rs. 5,000 |
| Half Page (B/W) | Rs. 3,000 |
| QuarterPage (B/W) | Rs. 1500 |

Name and Address : ______________________

______________________

______________________

______________________

*Adveriser's Signature*

# चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना

र.नं. ३९६७

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली कार्यक्षेत्र

**कार्यालय : पांडुरंग चौधरी, गोविंदराव वारजुकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभिड, जि. चंद्रपूर**

## चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा स्तरिय चौथे अधिवेशन

शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू भगिनींना, सप्रेम नमस्कार,

आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, कामगाराच्या नावावर आपल्या विचाराची पेरणी करणाऱ्या अनेक संघटना आहेत. परंतु चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना ही रितसर ट्रेड युनियन ॲक्टखाली पंजीकृत असून अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाची प्रतिनिधीत्व करणारी एकमेव संघटना आहे.

या संघटनेने आतापर्यंत कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. पण ते वैयक्तिक असो की, सामुहिक पगाराचा असो, या संदर्भात संघटना पुढेच राहिली. वास्तविक पाहता वेळेवर पगाराची गरज ही महाविद्यालयीन काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर या कर्मचाऱ्यांना असते. परंतु या संघटनेनी अनेकदा या प्रश्नांना वाचा फोडली आहे आणि हा प्रश्न सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला आहे.

जुनी पेंशन योजना त्वरित लागु करने, सातवा वेतन आयोग त्वरित लागु करने, कर्मचाऱ्यांना पदोन्नती, प्रवास रजा सवलत, अर्जित रजा, अनुकंपातत्वार नौकरी, महागाई भत्ता, वैद्यकिय देयक कॅशलेस पध्दतीने देण्यात यावे, नवीन सुधारीत विद्यापीठ कायद्यात सेवाप्रवेश नियमामध्ये शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेने तयार करून दिलेल्या प्रस्तावाचा विचार करण्यात यावा व विद्यापीठाच्या विविध समित्यावर महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात यावी. तसेच विद्यापीठ सिनेट सदस्यांमध्ये अशासकीय महाविद्यालयाची वाढती संख्या लक्षात घेता अशासकीय महाविद्यालयातील सिनेट सदस्यांची वाढ करण्यात यावी इत्यादी प्रश्नांवर शिक्षण संचालक उच्च शिक्षण पुणे व सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर यांचेशी अनेकदा चर्चा केलेली आहे. काही प्रश्न सुटले आहेत व अजूनही अनेक प्रश्न प्रलंबीत आहेत. त्यासाठी आम्हास **''भिक नको हवे कामाचे दाम''** हे संघटनेचे ब्रिद वाक्य आहे. त्याकरीता संघटने तर्फे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे **एक दिवसीय जिल्हा स्तरीय चौथे अधिवेशन दि. ३० डिसेंबर २०१८ ला** ***गोविंदराव वारजुकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभिड, जि. चंद्रपूर*** येथे घेण्याचे ठरविले आहे. ह्याप्रसंगी **''स्मरणिका''** काढण्याचा संकल्प असून स्मरणिकेत शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसंबंधी जी.आर. संघटनेने केलेल्या चर्चेविषयी सविस्तर माहिती, सामाजिक मार्गदर्शनपर लेख इत्यादी प्रकाशित होणार आहे. तरी आपण आपले महाविद्यालय, संस्था, शुभेच्छुकाच्या शुभेच्छा तसेच संघटनेच्या जाहिराती देऊन सहकार्य करावे.

प्रत्येक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी रू. ३००/-- अधिवेशन शुल्क देवून अधिवेशनात तन, मन, धनाने सहकार्य करावे. अधिवेशन प्रमुख संयोजक म्हणुन श्री. पांडुरंग चौधरी, गोविंदराव वारजुकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागभिड, जि. चंद्रपूर, सहसंयोजक म्हणुन श्री. प्रशांत बा. रंदई, जनता महाविद्यालय, चंद्रपूर यांची नियुक्ती झालेली आहे. करिता सर्वांनी सहकार्य करावे ही विनंती. धन्यवाद !

*** विनीत ***

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| विशाल गौरकार<br>जिल्हा अध्यक्ष<br>९८५०३६९७४७ | रूपेश चिंचोळे<br>जिल्हा महासचिव<br>९७६३२३३०४४ | रंजन टेप्पलवार<br>जिल्हा कार्याध्यक्ष | मनोहर मुंगळे<br>जिल्हा कोषाध्यक्ष | प्रशांत रंदई<br>जिल्हा उपाध्यक्ष<br>८४८२९७०३३० | सोमा धारणे<br>जिल्हा उपाध्यक्ष | अतुल अल्याडवार<br>जिल्हा सचिव |
| राजेश मुडावार<br>जिल्हा सचिव | हुमेश काशिकर<br>जिल्हा संघटक | लोमेश दरडे<br>जिल्हा संघटक | कु. मेघा पत्रे<br>जिल्हा महिला प्रतिनीधी | रामचंद्र निखाडे<br>जिल्हा सल्लागार | विजयकुमार जांभुळकर<br>जिल्हा सल्लागार | |
| विनोद चोपावार<br>विदर्भ अध्यक्ष | सुरेंद्र दंडवते<br>विदर्भ महासचिव | शामराव पंचवटे<br>विदर्भ कार्याध्यक्ष | .प्रकाश म्हसे<br>अध्यक्ष<br>महाराष्ट्र राज्य महासंघ | रावसाहेब त्रिभुवन<br>महासचिव<br>महाराष्ट्र राज्य महासंघ | गजानन काळे<br>कार्याध्यक्ष<br>महाराष्ट्र राज्य महासंघ | |
| विजय घरत<br>विदर्भ प्रतिनीधी | सचिन सुरवाडे<br>विदर्भ प्रतिनीधी | सुनिल चिमुरकर<br>विदर्भ सचिव | सतिश मशारकर<br>विदर्भ उपाध्यक्ष | शशिकांत माडे<br>महासंघ प्रतिनिधी | चंद्रकांत खोके<br>महासंघ प्रतिनिधी | विलास चुदरी<br>महासंघ प्रतिनिधी |

**चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा अशासकीय महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचारी व सन्माननिय सदस्य.**